दैनिक

# वादळ वार्ता

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक






vadalvartanews@gmail.com ●संपादक : अजय भांगे ●उपसंपादक : गणेश गाडेकर https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● शुक्रवार दि.२२ ऑगस्ट २०२५ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष ३ रे ● अंक ७ वा ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Friday 22 August 2025 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 3rd ● Issue 7 ● Pages 4 ● Rate 4 Rs


# पावसाचा कहर; मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्री अलर्टवर

## तात्काळ मदतीसाठी जिल्हाधिकाऱ्यांना अधिकार
## नुकसानग्रस्त पिकांचे पंचनामे करण्याचे आदेश

### मदतीचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना

**ज्या ठिकाणी जनावरांचे नुकसान झाले आहे, घरांचे नुकसान झाले आहे किंवा दुर्दैवाने मृत्यू झाला आहे. त्या संदर्भातले मदतीचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना दिलेले आहेत.**

**एनडीआरएफच्या नियमाप्रमाणे जिल्हाधिकारी त्यांना तात्काळ मदत करू शकतात. त्यांना थेट पैसे देण्याचेही अधिकार दिलेले आहे. त्यामुळे तिथे अडचण येणार नाही. शेती संदर्भात देखील पंचनामे करण्याचे आदेश देण्यात आले आहेत, असे देखील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितला आहे.**

**छत्रपती संभाजीनगर (वृत्तसंस्था)**–राज्यात १४ लाख एकर पिकांचे नुकसान झाले असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले आहे. राज्यात अनेक भागांमध्ये अतिवृष्टी झाली असल्याचे देखील त्यांनी सांगितले. राज्यातील १२ ते १४ लाख एकर वरील शेती बाधित झाली असल्याचे ते म्हणाले. राज्यात अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी झाली असल्याचे त्यांनी सांगितले. मात्र राज्यातील परिस्थिती बऱ्यापैकी नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न सुरु आहे.

मुंबईतील मिठी नदी धोका पातळीवर गेली असल्यामुळे सुरुवातीच्या काळात अनेकांना वाचवण्यासाठी प्रयत्न करावे लागले असल्याचे त्यांनी सांगितले आहे.

अलीकडच्या काळात राज्यात मोठ्या प्रमाणात पाऊस पडणार असल्याचा अंदाज वर्तवला जात आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे देखील स्वतः



मिठी नदीवर जाऊन पाहणी करत आहेत. सर्वच ठिकाणची परिस्थिती नियंत्रण ठेवण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. मुंबईतील नागरिकांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. जास्तीत जास्त लोकांना वर्क फॉर्म होम देण्याचे निर्देश राज्य सरकारच्या वतीने देण्यात आले असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. आतापर्यंतची परिस्थिती बऱ्यापैकी नियंत्रणात असली तरी अलीकडच्या काळात मोठ्या प्रमाणात पाऊस आणि टायफाइड असल्यामुळे उपाययोजना कराव्या लागणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.

राज्य शासनाच्या वतीने छऊठऋ आणि डऊठऋ ला अलर्टवर ठेवण्यात आले आहे. काही नद्या इशारा पातळीच्या वर देखील गेल्या आहेत, तर काही नद्या इशारा पातळीवर वाहत आहेत. शेजारील राज्यांसोबत उत्तम समन्वय साधला जात आहे. त्यांच्याशी संवाद सुरू आहे. शेजारी राज्य देखील महाराष्ट्राला मदत करत आहेत. काही राज्यांनी विसर्ग सुरू केला आहे. आपण देखील काही विसर्ग करत आहोत. तेलंगणा राज्य सोबत देखील आपण संपर्क करत असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

# लढवय्या दलित नेता कपिल मस्के : काल–आज नि उद्या

## अष्टपैलु वृत्तीमुळे अनेक झाले आरोप पण मागे हटले नाही



**केज । प्रतिनिधी**

वयाच्या अवघ्या १५ वर्षांच्या कोवळ्या वयात फुलेनगरातून समाजकार्यात उडी घेतलेला लढवय्या दलित नेता कपिल मस्के आज जिल्ह्यात ठाम व स्पष्टवक्तेपणाने ओळखला जातो. लहानपणापासूनच सामाजिक भान जपत त्यांनी अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्यास सुरुवात केली.

सामाजिक कार्यकर्ते म्हणून वाटचाल करताना त्यांनी ग्रामपंचायत सदस्य, नगरसेवक म्हणून कामकाज पाहिले. समाजातील वंचित घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी, गोरगरीब कुटुंबांच्या प्रश्नांवर आवाज उठवण्यासाठी त्यांनी आघाडी घेतली.

लढवय्या वृत्तीमुळे अनेकदा त्यांच्यावर आरोप झाले, विरोधकांनी विविध अडथळे आणण्याचा प्रयत्न केला, परंतु कपिल मस्के कधीही मागे हटले नाहीत. त्यांच्या धडाडीच्या शैलीमुळे ते लोकांच्या मनात ठामपणे स्थान निर्माण करू शकले.

आज ते समाजातील अनेक आंदोलनांचे नेतृत्व करत आहेत. गायरान जमिनीवरील अतिक्रमणाचा प्रश्न असो की, दलित वस्तीतील मुलभूत सुविधांचा लढा – कपिल मस्के नेहमीच अग्रभागी दिसतात.काल एका किशोरवयीन मुलाने घेतलेली समाजकारणाची धडाडीची उडी, आज न्यायासाठी झटणारा संघर्षशील नेता आणि उद्या जिल्ह्यातील वंचित घटकांचा अधिक मोठा आधारस्तंभ–अशा 'काल–आज नि उद्या' या परिपूर्ण प्रवासातून कपिल मस्के हे खऱ्या अर्थाने दलितांचे लढवय्या नेते ठरले आहेत.


# मांजरा धरण १०० टक्के भरले
# माजराचे सहा दरवाजे उघडले

## मांजरा नदी काठावरील नागरिकांना दक्षतेचा इशारा

**केज । गौतम बचुटे**

बीड जिल्ह्यातील केज तालुक्यात मांजरा नदीवर असलेल्या धनेगाव येथील धरण पूर्ण क्षमतेने भरले असून धरणातील पाणी पातळी नियंत्रित करण्यासाठी धरणाचे सहा दरवाजे ०.२५ मिटरने उघडले आहेत.

मांजरा धरण पाणलोट क्षेत्रात पडत असलेल्या पावसामुळे व धरण पाणी पातळी नियंत्रित करण्याचे दृष्टीने दि. २१ ऑगस्ट रोजी सायंकाळी ६:०० वाजता धरणाच्या सांडव्याची ६ वक्रद्वारे क्र.१, २, ३, ४, ५ आणि ६ क्रमांकाचे दरवाजे हे ०.२५ मीटरने उघडले आहेत. त्या सहा वक्र दरवाजातून मांजरा नदी पात्रात ५२४१.४२ क्युसेक्स (१४८.४४ क्युमेक्स) इतका विसर्ग सूरू आहे.मांजरा काठच्या लोकांना दक्षतेचा इशारा :– मांजरा धरणामध्ये येणारी पाण्याची आवक





पाहून विसर्ग वाढवणे किंवा कमी करणे बाबत निर्णय घेण्यात येईल.त्यामुळे मांजरा नदी काठावरील आणि पुरामुळे बाधित होणाऱ्या गावातील नागरीकांनी खबरदारी घ्यावी. असे आवाहन मांजरा प्रकल्प धनेगाव पुर नियंत्रण कक्षाद्वारे कळविण्यात आले आहे.

# राजकुमार हरिभाऊ साळवे यांचे निधन

**परळी । प्रतिनिधी**

गंगाखेडचे माजी नगराध्यक्ष दिवंगत हरिभाऊ साळवे यांचे सुपुत्र राजकुमार हरिभाऊ साळवे यांचे आज दि.२१ ऑगस्ट रोजी परळी येथील भीमनगर येथील राहत्या घरी ५ वाजण्याच्या सुमारास हृदय विकाराच्या तीव्र झटक्याने दुःखद निधन झाले आहे. वयाच्या ५४ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला.

दिवंगत राजकुमार हरिभाऊ साळवे यांच्या पार्थिवावर उद्या, दिनांक २२ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी १०:३० वाजता परळी येथील शांतीवन, स्मशानभूमी, भीमनगर येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.



# शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळावी यासाठी अजितदादा पवार यांना रमेशराव आडसकरांनी दिले निवेदन

**मुंबई । प्रतिनिधी**

मागील काही दिवसांत बीड जिल्ह्यात अतिवृष्टी झाल्यामुळे शेतांना तळ्याचे स्वरूप आले होते.यामुळे सर्व पिके वाहुन गेले आहेत. त्यामुळे शेतकरी हतबल झाले आहेत.

केज तालुक्यात शेतांना अतिवृष्टीचा अधिक फटका बसला आहे. रमेशराव आडसकर यांनी स्वतः शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पाहणी करून शासन दरबारी आपण भेटून शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करू असे आश्वासन दिले होते.

काल राज्याचे उप मुख्यमंत्री अजितदादा पवार यांची भेट घेऊन सर्व परिस्थितीची माहिती देऊन शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळावी अशा मागणीचे निवेदन दिले आहे.शेतकऱ्यांना लवकरच आर्थिक मदत दिली जाईल असे आश्वासन अजितदादा



पवार यांनी यावेळी दिले आहे.यामुळे सर्व शेतकरी वर्गातून समाधान व्यक्त केले जात आहे.


# बापाचे कर्ज फेडावे कसे म्हणून तरूणाने घेतला गळफास

## केज तालुक्यातील चिंचोली माळी येथे तरुण शेतकऱ्याची आत्महत्या

**केज । गौतम बचुटे**

वडिलांच्या नावे असलेले पीक कर्ज कसे फेडायचे ? या विवंचनेतून नैराश्य आलेल्या एका तरुण शेतकऱ्याने राहत्या घरात लोखंडी आडूला साडीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना चिंचोलीमाळी ता. केज येथे गुरुवारी दि. २१ ऑगस्ट रोजी सकाळी १०:०० वा. च्या सुमारास उघडकीस आली.

केज तालुक्यातील चिंचोली माळी येथील अजय बापूराव थोरात वय (२९ वर्ष) या तरुण शेतकऱ्याचे वडील बापूराव थोरात यांच्या नावे सुमारे दोन एकर जमीन आहे. वडील वृद्ध असलेल्या अजय थोरात हा शेती करीत होता. त्याचे वडील बापूराव थोरात यांच्या नावे महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या शाखेतून दीड लाख रुपयांचे पीक कर्ज घेऊन शेतात पेरणी केली होती. पेरणी नंतर पावसाने घेतलेली ओढ आणि मागील आठवड्यापासून अतिवृष्टी व संततधार पावसाने पिकाचे उत्पन्न निघाले नाही, तर वडिलांच्या नावावरील बँकेचे घेतलेले पिक कर्ज कसे फेडायचे ? या विचाराने अजय थोरात चिंताग्रस्त बनला होता. या नैराश्यातून अजय थोरात याने टोकाची



भूमिका घेऊन आपल्या राहत्या घरातील लोखंडी आडूला साडीने गळफास घेऊन जीवनयात्रा संपविल्याचे गुरुवारी सकाळी १०:०० वा. उघडकीस आले. या घटनेची माहिती मिळताच पोलीस उपनिरीक्षक सुकुमार उर्फ राकेश बनसोडे, बिट जमादार बाबासाहेब बांगर यांनी घटनास्थळी भेट देऊन मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी पाठवून दिला. प्राथमिक आरोग्य केंद्र चिंचोली माळी येथे शवविच्छेदन केल्या नंतर त्याच्या पार्थिवावर सार्वजनिक स्मशान भूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्याच्या पश्चात आई, वडील, भाऊ असा परिवार आहे. या घटनेबद्दल गावात हळहळ व्यक्त केली जात आहे.

संपादकीय

## ढगफुटीनंतर अश्रूंचा बांध फुटला...

निसर्गापुढे कोणाचेच काही चालत नाही, याचा प्रत्यय मराठवाड्यात पुन्हा एकदा आला. नांदेड जिल्ह्यातील मुखेड तालुक्यात ढगफुटीनंतर एकाच रात्रीत शेकडो जनावरे पुराच्या पाण्यात वाहून गेली, तर ८ जणांना आपला जीव गमवावा लागला. एन. डी. आर. एफ. च्या पथकाने अनेकजणांना सुखरूप बाहेर काढले. त्यानंतरच बचावकार्य वेगाने सुरू झाले. रात्री जेवण करून झोपलेल्या नागरिकांना सकाळची पहाट पाहता येणार नाही, असे स्वप्नातही वाटले नव्हते. पुराच्या पाण्याने गावागावात अतोनात हाल करीत परिसीमाच गाठली. मराठवाड्यातील नांदेड, हिंगोली, लातूर व परभणी जिल्ह्यांत अतिवृष्टीमुळे सर्वाधिक नुकसान झाले.मराठवाड्यात सतत दोन दिवस सर्वत्र पावसाचा धुमधडाका सुरू होता. पावसाने रौद्ररूप धारण केल्यामुळे सर्वत्र हाहाकार उडाला. नांदेड, हिंगोली, लातूर व परभणी जिल्ह्यांतील हजारो हेक्टरवरील खरीप पिके पाण्याखाली गेली. अचानक आलेला पाऊस व पुरामुळे गोठ्यात बांधलेली जनावरे देखील वाहून गेली. नांदेड जिल्ह्यातील मुखेड तालुक्यात ढगफुटी झाल्यानंतर परिस्थिती हाताबाहेर गेली. २४ तासांनंतर पाच जणांचे मृतदेह सापडले. तर अन्य पाचजण बेपत्ता झाल्यानंतर त्यांचा शोध घेण्यासाठी लष्कराच्या पथकाला पाचारण करावे लागले.त्या पथकालाही पुराच्या पाण्यात वाहून गेलेल्यांचा शोध घेण्यासाठी बराच वेळ लागला. मराठवाड्यात झालेल्या या अतिवृष्टीमुळे शेकडो जनावरे पाण्यात वाहून गेली. मराठवाड्यातील अनेक शेतकऱ्यांचे गोधन पुराच्या पाण्यात हरपले आहे. त्यांना शोधत असताना शेतकऱ्यांच्या डोळ्यांत अश्रू वाहत होते. एकीकडे ढगफुटीने हाल केलेले असताना, ऐन पोळा सण तोंडावर असताना गोधन हरपल्याने शेतकऱ्यांच्या अश्रूंचा बांध फुटला आहे. दूध देणारी म्हैस तसेच गाय-वासरू, बकरी, कोंबड्या या पाण्यात वाहून गेल्या. लातूर जिल्ह्यातील उदगीरमध्येही खूप मोठा पाऊस झाला. त्या ठिकाणी जनजीवन विस्कळीत झाले. नांदेड जिल्ह्यातील मुक्रमाबादजवळ एका चार चाकी वाहनातील तीन महिला व तीन पुरुष पुराच्या पाण्यात वाहून गेले. मराठवाडा व विदर्भाला जोडणारा किनवट जवळील पूल पाण्याखाली बुडाल्याने येथील वाहतूक पूर्णपणे बंद होती. मराठवाड्यात खूप मोठा पाऊस झाल्याने कापणीला आलेले सोयाबीन हातचे गेले. सततच्या पावसामुळे कापूस, सोयाबीन, हळद व उसाचे मोठे नुकसान झाले. या मुसळधार पावसामुळे शेतात असलेले पीक नसल्यात जमा झाले.मुखेड तालुक्यातील हसनाळ या गावात खूप मोठा पाऊस झाला. गावात पूर आल्यामुळे पाण्यात वाहून गेलेली ललिताबाई भोसले, भीमाबाई हिराबन मादाळे व गंगाबाई गंगाराम मादाळे या तिघांचा मृत्यू झाला. तसेच सहाजण वाहून गेले होते. त्यापैकी चंद्रकला विठ्ठल शिंदे या ४५ वर्षीय महिलेचे प्रेत दुसऱ्या दिवशी शोध पथकाला आढळले. नांदेड जिल्ह्यातील लेंडी प्रकल्प बाधित क्षेत्रात बुडालेल्या गावांमध्ये थेट लष्कराकडून बचावकार्य सुरू होते. दरम्यान नांदेड जिल्ह्यातील मुखेड व लातूर जिल्ह्यातील उदगीर तालुक्याच्या सीमेवर धडकनाळ येथील पुलावरून चार पुरुष, तीन महिला असलेली कार तसेच एक ऑटो पुराच्या पाण्यात वाहून गेली. त्यापैकी तीन पुरुषांना पथकामार्फत वाचविण्यात आले. नांदेड जिल्ह्यातील मुखेड जवळील रावणगाव येथे २२५ नागरिक पुराच्या पाण्यात अडकले होते. तर हसनाळ या गावातून आठजणांना पथकाने सुखरूप बाहेर काढले. तशीच परिस्थिती भासवाडी या गावातील होती. त्या ठिकाणी असलेले २० नागरिक पुरामध्ये अडकले होते. तर मुखेड तालुक्यातील भिंगेली येथील ४० नागरिक पुराच्या पाण्यात अडकल्याने त्यांना वाचविण्यासाठी एनडीआरएफ पथकाला पाचारण करावे लागले. या पथकाला पाचारण केल्यानंतरच प्रत्यक्षात पूरग्रस्तांना वाचविण्यात यश आले. हे पथक वेळेवर आले नसते तर कदाचित मराठवाड्यात मृत्यूचा आकडा खूप मोठा वाढला असता, तालुक्यातील भेंडेगाव संपूर्ण पाण्याखाली वेढले गेले होते. तर दोन गावाला जोडणारा बेरळी पूल वाहून गेल्याने संपूर्ण गावात पाणी शिरले. मराठवाड्यातील नांदेड, लातूर, हिंगोली व परभणी जिल्ह्यांत पावसाने हाहाकार माजविला होता. यापूर्वी कधीही एवढा मोठा पाऊस पडला नव्हता, अशी प्रतिक्रिया ग्रामस्थांनी दिली. काही ज्येष्ठ नागरिकांनी या पावसाबद्दल प्रतिक्रिया व्यक्त करताना असेही सांगितले की, एवढा मोठा पाऊस १९८२ नंतरच पाहावयास मिळाला.


नांदेड जिल्ह्यातील मुखेड तालुक्यातील अतिवृष्टीग्रस्त हसनाळ गावास आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी भेट दिली. गावातील नागरिकांच्या समस्या त्यांनी जाणून घेतल्या. मुखेड तालुक्यातील बारा गावांना पाण्याचा वेढा असल्याने त्यांना अनेक ठिकाणी पोहोचता आले नाही. हसनाळ (प.मु.) या गावात पुराचे पाणी शिरल्यामुळे पाच जणांचा मृत्यू झाल्याने संपूर्ण गावात शोककळा पसरली. गावातील मयत कुटुंबीयांची मंत्री महाजन यांनी भेट घेतली. मराठवाड्यातील अनेक मंत्री एका वर्तमानपत्राच्या पुरस्कार सोहळ्यानिमित्त लंडनला आहेत. त्यामुळे त्यापैकी कोणीही या पूरग्रस्त भागात हजेरी लावू शकले नाही. सोशल मीडियावर मराठवाड्यातील अनेक नेत्यांविरुद्ध अपशब्द वापरणारे पोस्ट व्हायरल होत आहेत. दि. १८ ऑगस्ट रोजी मुखेड-उदगीर रस्त्यावरील धडकनाळ येथील पुलावरून एक कार व एक ऑटोमधील सातजण पुराच्या पाण्यात वाहून गेले होते. यातील ३ जणांना वाचविण्यात उदगीर अग्निशमन दलाला यश आले. उर्वरित ४ बेपत्ता झालेल्यांपैकी ३ जणांचे मृतदेह सापडले. एकंदरीत मराठवाड्यात झालेल्या पावसात नांदेड जिल्ह्याचे सर्वाधिक नुकसान झाले. मुखेड तालुक्यात ढगफुटी झाल्याने तेथील जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले. ज्यांच्या घरातील नागरिक या पावसामुळे मरण पावले त्यांना स्वतःचे अश्रू आवरता आले नाहीत. ढगफुटीचा कहर व त्यानंतर अश्रूंचा बांध फुटल्याने मुखेड तालुक्यावर खूप मोठी शोककळा पसरली.

# जागतिक स्पर्धेत यशस्वी होण्यासाठी इंग्रजीवर प्रभुत्व मिळवणे गरजेचे-प्राचार्य डॉ.विजयकुमार बांदल

## 'संडे इस कम्युनिकेशन डे' इंग्लिश कम्युनिकेशन कोर्सच्या तिसऱ्या बॅचचे प्राचार्य डॉ.बांदल यांच्या हस्ते उद्घाटन

**बीड । प्रतिनिधी**

शैक्षणिक क्षेत्रातील नाविन्यपूर्ण उपक्रमांसाठी प्रसिद्ध असलेल्या तुलसी समूहाने इंग्रजी, जर्मन आणि जपानी अशा आंतरराष्ट्रीय भाषा प्रशिक्षणाच्या क्षेत्रात पाऊल टाकले असून प्रा.प्रदीप रोडे यांच्या संकल्पनेतून मागील दोन वर्षांपासून तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय, बीड येथे 'इंग्लिश कम्युनिकेशन कोर्स' यशस्वीपणे चालू आहे. या उपक्रमाअंतर्गत सुरू झालेल्या तिसऱ्या बॅचचे उद्घाटन सोमवारी (दि.१८) प्राचार्य डॉ.विजयकुमार बांदल यांच्या हस्ते झाले.




कार्यक्रमाला प्राचार्य प्रा.डी.जी.निकाळजे प्रमुख पाहुणे म्हणून योगा शिक्षक डॉ.सुनील जोंधळे तर अध्यक्षस्थानी अचिव्हर्स अकॅडमीचे संचालक प्रा.अर्जुन राठोड उपस्थित होते. प्राचार्य बांदल यांनी इंग्रजी भाषेचे व्यावहारिक महत्त्व अधोरेखित करताना आजच्या काळात जागतिक स्तरावर स्पर्धा करायची असेल तर इंग्रजीचे प्रभुत्व आवश्यक असल्याचे स्पष्ट केले.

अध्यक्षीय भाषणात प्रा.अर्जुन राठोड यांनी इंग्रजी भाषेच्या व्यावहारिक उपयोगावर प्रकाश टाकला. या कोर्समधून विद्यार्थ्यांना गटचर्चा, मुलाखत तयारी आणि प्रात्यक्षिक सरावाचा लाभ मिळेल तसेच आधुनिक डिजिटल लॅब आणि समृद्ध ग्रंथालयामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना इंग्रजी आत्मसात करण्याची सुवर्णसंधी मिळणार असल्याचे त्यांनी नमूद केले.कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन समन्वयक डॉ. विकास वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली, महाविद्यालयाचे शिक्षकवृंद व विद्यार्थ्यांच्या सक्रिय सहभागातून करण्यात आले. सूत्रसंचालन ऋतुजा पराडे व तनिष्का आगे यांनी केले तर आभार प्रा.शिल्पा बोराडे यांनी मानले.

# केज तालुक्यात येवला तांडा आणि कोल्हेवाडी येथे तीन घरे फोडून मोटार सायकल चोरी;घटनास्थळी शांत पथक पाचारण

**केज । गौतम बचुटे**

तालुक्यात २१ ऑगस्ट रोजी मध्यरात्री दोन गावात तीन ठिकाणी घरफोडी झाले असून एक मोटरसायकल देखील चोरट्यांनी चोरून नेली आहे. या चारही घटनेत सुमारे पाच लाखा पेक्षा जास्त किमतीचा ऐवज चोरीला गेलेला आहे. दिनांक २१ ऑगस्ट रोजी मध्यरात्री केज तालुक्यातील येवता तांडा येथील आत्माराम बन्सी राठोड यांच्या घराचा दरवाजा उघडून घरातील पेटीत ठेवलेले नगदी २ लाख ६० हजार रुपये आणि ३.५ तोळे सोन्याचे दागिने ऐवज चोरट्यांनी चोरून नेला. त्या नंतर त्यांच्याच घरा शेजारी राहत असलेले त्यांचे वडील बन्सी दगडू राठोड यांच्याही घरी चोरट्यांनी त्यांच्या घरातील पेटी ठेवलेले ३.५ तोळे सोन्याचे दागिने घेऊन पोबारा




केला. त्या नंतर केज तालुक्यातील कोल्हेवाडी येथे बाबासाहेब मिसाळ यांच्या घरातील कपाटात ठेवलेले नेकलेस, दोन अंगठ्या, झुंबर, नथ असे एकूण १ लाख १० हजार ५०० रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरून नेले. तसेच याच वेळी दत्ता रामचंद्र मिसाळ यांच्या घरा समोर उभी असलेली नवी शाईन मोटार सायकल क्र.(एम एच-४४/ए एफ-०३१२) त्याची किंमत १ लाख आहे ती देखील चोरट्याने चोरून नेली.

दरम्यान पोलिसांना या चारही चोरीच्या प्रकरणाची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक स्वप्निल उनवणे, पोलीस उपनिरीक्षक उमेश निकम यांच्यासह पोलीस जमादार शेप आणि चंद्रकांत काळकुटे यांनी घटनास्थळी भेट दिली. चोरीची फिर्याद नोंदविण्याची प्रक्रिया सुरू आहे.श्वान पथकाने केला चोरांचा माग काढण्याचा प्रयत्न :- या चार चोरीचा घटनेचा तपास लावून चोरांचा माग शोधण्यासाठी श्वानपथक पाचारण करण्यात आले होते. परंतु चोरट्यांनी वाहनाचा वापर केला असल्याने श्वानपथकाला अडचणी निर्माण झाल्या आहेत. मात्र पोलिस कसून तपास करीत आहेत.

# जयसिंग वीर च्या नेतृत्वाखाली करचुंडीतील गायरान प्रकरणी जिल्हा कचेरी समोर बेमुदत धरणे आंदोलन सुरु

**बीड । प्रतिनिधी**

मौजे करचुंडी गावालगत असणारी गायरान जमिन मिळावी यासाठी धरणे आंदोलन करणेत आले होते.तरी त्या आंदोलन काळादरम्यान आंदोलन कर्त्याच्या मागण्या मान्य न झालेमुळे दिनांक १४/०८/२०२५ ते मागण्या मान्य होईपर्यंत तसेच तीव्र आंदोलन चालू केले आहे.आंदोलन दरम्यान असणाऱ्या मागण्या पुढील प्रमाणे आहेत त्यामध्ये करचुंडी गावा व मंजेरी गाव बीड जिल्ह्यातील अनेक गावांदरम्यान लगत असणाऱ्या गायरान जमिनीचे पीडीत वंचित भूमिहिन शेतकऱ्यांना वाटप करणे पायी मोर्चा अनेक गावांदरम्यान लगत असणाऱ्या गायरान जमिनीचे वंचित भूमिहिन शेतकऱ्यांना वाटप करणे.सातबारा मध्ये शेतकऱ्यांचे नाव नोंद करणे अथवा चढवणे. पीक पंचनामे करणे तसेच पीक विमा शेतकरी पेंन्शन योजना मोफत बी बियाणे, अवजारे, शेततळे, मोफत वीज (सोलार पंप) आदी सवलती सुविधा लाभ देणे. सदर गायरान जमिनीचे पुर्ण अधिकार देणे आदि मागण्या संदर्भात मागण्या मान्य होईपर्यंत बीड जिल्ह्यातील बहुजन शेतकरी बांधव या आंदोलनात सहभागी होणार आहे व सदरचे आंदोनास मोठ्या संख्येने शेतकरी सहभागी होणार




आहेत. गावाचे नाव करचुंडी मंजेरी गाव बेलखंडी व इतर गेवराई तालुक्यातील व माजलगाव तालुक्यातील सर्व बीड जिल्हा तालुक्यातील खेड्यापाड्यातील दलीत बांधव व विविध संघटना व विविध पक्षाचे पदाधिकारी यांनी पाठिंबा दर्शविला आहे.

# जि.प.च्या शाळा दुरुस्त करण्याच्या मागणीसाठी 'आप'ने 'झोप काढू' आंदोलन जी.प.समोर केले

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यामध्ये जिल्हा परिषदेच्या शाळांची दुरवस्था सुधारण्यासाठी आणि त्यांना आवश्यक मूलभूत सुविधा पुरवण्यासाठी आम आदमी पार्टी (आप) ने 'झोप काढू' आंदोलन करण्यात आले. महाराष्ट्र प्रदेश सचिव सुग्रीव मुंडे महाराष्ट्र सचिव या आंदोलनास आवर्जून उपस्थित राहिले व माजी सैनिक अशोक येडे, जे 'आप'चे जिल्हाध्यक्ष , यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले. 'आप'च्या शिष्टमंडळाने बीड जिल्ह्यातील काही शाळांची पाहणी केली असता, त्यांना अनेक गंभीर समस्या आढळल्या. यामध्ये शाळांच्या इमारतींची खराब झालेली स्थिती, काही ठिकाणी शौचालये आणि पिण्याच्या पाण्याची सोय नसणे, तर काही शाळांमध्ये शिक्षकांची कमतरता अशा बाबी समोर आल्या आहेत. काही शाळा तर भाड्याच्या इमारतींमध्ये किंवा झाडांखाली भरत आहेत. 'आप'ने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सरकार या गंभीर समस्येकडे दुर्लक्ष करत आहे, जणू काही ते झोपलेच आहेत.

याच कारणामुळे, सरकारला जागे करण्यासाठी आणि या शाळा वाचवण्यासाठी उपाययोजना करण्याची आठवण करून देण्यासाठी २१ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ११ ते दुपारी २ वाजेपर्यंत 'झोप काढू' आंदोलन करण्यात येणार आहे. हे निवेदन मुख्यमंत्री, पालकमंत्री, आणि शिक्षणमंत्री यांना बीडच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांमार्फत




निवेदन मुख्यमंत्री शिक्षा मंत्री जिल्हाधिकारी महोदय मराठवाडा आयुक्त देण्यात आले आहे. या आंदोलनात जास्तीत जास्त नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन 'आप'ने केले आहे.

यावेळी 'आप'चे जिल्हाध्यक्षअशोक येडे, सहदेव खंडागळे, कैलासचंद पालीवाल, माऊली शिंदे, भीमराव कुठे जिल्हाध्यक्ष बामसेफ नितीन सोनवणे जिल्हाध्यक्ष ऑल इंडिया पँथर नितीन जायभाय बीड शहर बचाव मंच डीजे तांदळे सर शिक्षक संघटना अशोक जोगदंड संतोष जोगदंड यांना सय्यद सादेक, शहराध्यक्ष मिलिंद पाळणे, रफिक पठाण, कृष्णा जगताप तालुकाध्यक्ष बीड, व्यंकट मुंडे परळी राजेश देशमुख परळी शहराध्यक्ष नासिर मुंडे साहेब केज तालुका अध्यक्ष सुहास चौधरी आष्टी तालुकाध्यक्ष रफिक पठाण अल्पसंख्याक विभाग प्रमुख डॉक्टर दीपक कोल्हारआणि आजम खान यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

# एसएनडीटी बल्लारपूर कॅम्पस हे ग्रामीण मुलींच्या सक्षमीकरणाचे केंद्र-कुलगुरू प्रा.डॉ.उज्वला चक्रदेव

## एसएनडीटी महिला विद्यापीठ, बल्लारपूर आवाराच्या 'प्रगती पुस्तकाचे' विमोचन

**बल्लारपूर । प्रतिनिधी**

एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, मुंबईचे महर्षी कर्वे महिला सक्षमीकरण ज्ञानसंकुल, बल्लारपूर जिल्हा चंद्रपूर ( एसएनडीटी महिला विद्यापीठाचे बल्लारपूर आवार) च्या दोन वर्षांच्या प्रगतीची वाटचाल दाखविणाऱ्या प्रगती पुस्तकाचे विमोचन विद्यापीठाच्या कुलगुरू प्रा. डॉ. उज्वला चक्रदेव यांच्या हस्ते बल्लारपूर आवार येथील कार्यक्रमात उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. कुलगुरू दोन दिवसीय दौऱ्याकरिता बल्लारपूर येथे आल्या होत्या. कार्यक्रमाला आवाराचे संचालक डॉ. राजेश इंगोले, सन्मित्र सैनिक शाळेच्या प्राचार्या सौ. अरुंधती कावडकर, सहायक कुलसचिव डॉ. बाळू राठोड, समन्वयक डॉ. वेदानंद अलमस्त तसेच शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



विमोचन कार्यक्रमात बोलताना कुलगुरू डॉ. उज्वला चक्रदेव म्हणाल्या की, ग्रामीण आणि आदिवासी भागातील मुलींसाठी हे कॅम्पस म्हणजे ज्ञान, आत्मविश्वास आणि सक्षमीकरणाचे दार आहे. या प्रगती पुस्तकातून केवळ घडामोडींचा आलेख नाही तर या कॅम्पसची आत्मकथा पुढे येते. समाजातील सर्व घटकांनी हातभार लावल्यास हा कॅम्पस ग्रामीण भागातील महिलांच्या जीवनात नवा अध्याय घडवेल. सोबतच या कॅम्पसच्या निर्मितीसाठी सहकार्य केल्याबद्दल त्यांनी राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील व बल्लारपूरचे आमदार सुधीर मुनगंटीवर यांचे आभार मानले. त्यांच्या मुळेच या भागातील मुलींना उच्च शिक्षणाची दिशा प्राप्त होईल व महिला शिक्षणाची वाटचाल सुकर होईल.

संचालक डॉ. राजेश इंगोले यांनी या प्रसंगी आवाराच्या प्रगतीची वाटचाल आपल्या भाषणातून विशद केली. त्यांनी अधोरेखित केले की, अल्पावधीतच कॅम्पसने शैक्षणिक गुणवत्ता, सांस्कृतिक उपक्रम, सामाजिक बांधिलकी आणि भौतिक सुविधांच्या दृष्टीने उल्लेखनीय पावले उचलली आहेत.'प्रगती पुस्तकाची' मुख्य संकल्पना आणि संपादन सहायक कुलसचिव डॉ. बाळू राठोड यांनी केले आहे. प्रास्ताविक करताना त्यांनी सांगितले की, या कॅम्पसला दोन वर्षे पूर्ण झाली. महिला सक्षमीकरणाच्या दिशेने या कॅम्पस ची वाटचाल सुरू आहे. या पुस्तकात दोन वर्षांतील शैक्षणिक प्रगती, विविध विभागांची कामगिरी, विद्यार्थिनींच्या उपक्रमशीलतेचा आलेख, रोजगाराभिमुख प्रकल्प, इन्फ्रास्ट्रक्चर विकास, विद्यार्थिनींचे मनोगत तसेच स्थानिक समाजाशी असलेले संवाद यांचे समर्पक दस्तावेजीकरण करण्यात आले आहे. हे प्रगती पुस्तक म्हणजे केवळ वार्षिक अहवाल नसून, कॅम्पसच्या भविष्यदर्शी वाटचालीचे दर्पण आहे, असे ते म्हणाले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अश्विनी वाणी यांनी केले, तर आभार प्रदर्शन समन्वयक डॉ. वेदानंद अलमस्त यांनी मानले.

# रायगड जि.परिषद शाळा तळे मराठी, केंद्र तळे, तालुका तळा आयोजित विद्यार्थी गुणगौरव सोहळा मोठ्या उत्साहात साजरा

**बोरघर । प्रतिनिधी**

तळे मराठी शाळेतील विविध स्पर्धा परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा सोमवार दिनांक १८ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता तळे मराठी शाळेच्या सभागृहात विविध सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष भास्कर गोळे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिद्ध आरोग्य दूत डॉ. सतीश वडके, बँक ऑफ इंडिया चे निवृत्त शाखाधिकारी व लेखक श्री सुनील कुळकर्णी, माणगाव येथील पत्रकार विश्वास गायकवाड, निवृत्त केंद्रप्रमुख संदीप जामकर, दिपक ठाकूर सामाजिक कार्यकर्ते जगदीश गोळे तसेच तळे केंद्राचे केंद्रप्रमुख मुबीन वासकर हे उपस्थित होते.



कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रतिमा पूजन व दीप प्रज्वलन करण्यात आले. शाळेतील मुलींनी ईशस्तवन व स्वागतगीत गाऊन पाहुण्यांचे स्वागत केले. शाळेच्या वतीने शाल पुष्पगुछ व श्रीफळ देऊन पाहुण्यांचा सन्मान करण्यात आला. त्यानंतर डॉ. वडके, श्री कुलकर्णी व पत्रकार गायकवाड यांनी आपले अनुभव सांगताना मोलाचे मार्गदर्शन केले. गेली सलग सहा वर्ष तळे मराठी शाळेतील मुलांनी नवोदय परीक्षा व पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत तळा तालुक्यातच नव्हे तर संपूर्ण रायगड जिल्ह्यात टॉप केले आहे. तळे शाळेचे २५ विद्यार्थि नवोदय विद्यालयात शिक्षण घेत असून ६० विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षा पात्र झाले आहेत व त्यापैकी ३० विद्यार्थी जिल्हा मेरिट मध्ये शिष्यवृत्ती धारक झाले आहेत. याचा शाळेला नक्कीच अभिमान वाटत आहे. २०२४/२५ मध्ये २४ विद्यार्थी परीक्षेला बसले होते त्यापैकी १८ विद्यार्थी पात्र झाले आणि ९ विद्यार्थी शिष्यवृत्ती धारक झाले तसेच ३ विद्यार्थ्यांची नवोदय विद्यालयात निवड झाली त्या सर्वांना सन्मानचिन्ह पुस्तक पेन प्रमाणपत्र व पुष्पगुछ देऊन सत्कार करण्यात आला. त्यानंतर आरटिएस रायगड परीक्षेत २ विद्यार्थ्यांनी यश मिळवले त्यांचा सन्मान करण्यात आला. वर्षभरात घेण्यात आलेल्या गणित संबोध, होमी भाभा बालवैज्ञानिक परीक्षा मंथन प्रज्ञाशोध परीक्षा या स्पर्धा परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमात मार्गदर्शक म्हणून पूर्ण वेळ मोफत मार्गदर्शन करणारे आणि या शाळेचा नाव लोकिक वाढवणारे शिक्षक सुनील बैकर सर यांचा शा. व्य समिती व सहकारी शिक्षक यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष भास्कर गोळे यांनी शाळेच्या प्रगतीबाबत समाधान व्यक्त केले. मुलांनी आपल्या मनोगतात शाळेबद्दल विचार मांडले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापिका सुप्रिया जामकर यांनी केले. सूत्रसंचालन मितल वावेकर यांनी केले तर आभार प्रदर्शन सुनिल बैकर यांनी केले. सत्कार कार्यक्रमासाठी पालकांनी आर्थिक साहाय्य केले तसेच माडी, कोळी, गुरव, निकम, यांनी व्यवस्थापन ची धुरा सांभाळली. पालकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादत एक उत्तम कार्यक्रम संपन्न झाला.

# राजीव गांधी जयंती मोठ्या उत्साहात साजरी



**वसमत । प्रतिनिधी**

अहिल्याबाई होळकर कन्या विद्यालय सर्वप्रथम संगणक क्रांतीचे जनक राजीव गांधी यांच्या प्रतिमेस मान्यवरच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका सरिता पतंगे मॅडम ह्या होत्या. या दिवसाचे प्रमुख उद्दिष्टे म्हणजे राष्ट्रीय एकता सांप्रदायिक सलोखा आणि शांततेचा प्रसार करणे.

राजीव गांधींनी आधुनिक भारताच्या विकासासाठी आणि तंत्रज्ञान क्षेत्रात क्रांती घडवून आणण्यासाठी मोलाचे योगदान दिले.

सद्भावना दिवशी एक आठवण आहे की विविधतेतून एकता हेच आपल्या देशाचे वैशिष्ट्य आहे .हा दिवस प्रत्येक भारतीयाला सकारात्मक विचार सहिष्णुता आणि एकता प्रति आदर राखण्याचा संदेश देतो. यावेळी मिलिंद आळणे समतादूत शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# संजय राऊत यांनी अंगडियाचा धंदा सुरू केला आहे का?नवनाथ बन यांचा थेट सवाल

**मुंबई । प्रतिनिधी**

दिल्लीत दहा हजार कोटी रुपये ट्रान्सफर झाले असतील तर ते राऊत यांना कसं कळलं? त्यांनी अंगडियाचा नवा धंदा सुरू केला आहे का? की राऊत अंगाडियाकडे नोकर म्हणून काम करत होते? असे परखड प्रश्न करीत भाजपा माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन यांनी मंगळवारी पत्रकार परिषदेत खा. संजय राऊत यांच्यावर जोरदार हल्ला चढविला.



संजय शिरसाट यांच्यावरील आरोपांवरून श्री. बन यांनी राऊतांना खडे बोल सुनावले. ते म्हणाले की, संजय शिरसाट यांच्यावर आरोप करायचे, पण न्यायव्यवस्थेत कुठेही तक्रार दाखल करायची नाही. खरे तर चौकशी करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सक्षम आहेत पण फक्त माध्यमांसमोर वायफळ आरोप करणं, फक्त हवा तयार करणं हा राऊतांचा धंदा झालाय.

भ्रष्टाचाराच्या मुद्द्यावरूनही श्री. राऊत यांच्यावर ताशेरे ओढत श्री. बन म्हणाले की, पत्रा चाळ घोटाळ्याचे आरोप ज्यांच्यावर आहेत आणि ईडी कोर्टातून जामिनावर सुटलेले संशशित गुन्हेगार संजय राऊत भ्रष्टाचाराबद्दल बोलतात हे हास्यस्पद आहे. श्री. राऊत सतत या देशातील लोकशाही व्यवस्था मोडीत काढण्याचा प्रयत्न करत आहेत असा घणाघात ही त्यांनी केला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे पंगू आहेत या, राऊतांनी केलेल्या आरोपाचा समाचार घेताना श्री. बन म्हणाले, पंगू मुख्यमंत्री कोण होते हे महाराष्ट्राने पाहिलं आहे. वाझे काय लादेन आहे का? असं म्हणणारे, शंभर कोटींची वसुली सुरू असताना गृहखात्याच्या कारभारात बघ्याची भूमिका घेणारे तत्कालीन मुख्यमंत्री उबाठा हे पंगू होते, हे महाराष्ट्राने पाहिले आहे.

**राऊत हे राहुल गांधींचे झिलकरी बनले**

राहुल गांधींची भाषा जशी आहे तशीच भाषा श्री. राऊत बोलतात. राऊत हे राहुल गांधींचे झिलकरी बनल्याचे चित्र वारंवार दिसते आहे. काल राज्यपालांचं कौतुक करणारे श्री. राऊत, राहुल गांधींना भेटले की त्यांची भाषा लगेच बदलते आणि ते अचानक राज्यपालांवर टीका करतात. राहुल गांधींची किती हांजी हांजी करणार, असा थेट सवालही श्री. बन यांनी केला.

# सावंतवाडीतील उद्योजक विशाल परब यांचा भाजपामध्ये प्रवेश

**मुंबई । प्रतिनिधी**

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सावंतवाडी येथील युवा उद्योजक विशाल परब यांनी मंगळवारी भारतीय जनता पार्टीमध्ये पुन्हा प्रवेश केला. भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत परब यांचा प्रवेश झाला. उबाठा ठाणे ग्रामीण उप जि.प्रमुख, सदाशिव सासे, माजी जि.प सदस्य, जयश्री सासे, सुवर्णा राऊत यांच्यासह उबाठा च्या अनेक कार्यकर्त्यांनीही भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला. प्रदेश कार्यालयात झालेल्या पक्षप्रवेश कार्यक्रमाला आ. किसन कथोरे, प्रदेश सरचिटणीस आ.विक्रांत पाटील, सिंधुदुर्गचे भाजपाचे जिल्हाध्यक्ष प्रभाकर सावंत, आ. विक्रम पाचपुते, प्रदेश माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन आदी उपस्थित होते.



यावेळी रविंद्र चव्हाण म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली पुन्हा मला जोमाने काम करायची इच्छा आहे अशी विनंती विशाल परब यांनी कित्येकदा केली होती. त्यांच्या विनंती चा मान राखत, देशात नरेंद्रजी आणि राज्यात देवेंद्रजी यांच्या नेतृत्वाखाली भाजपा पक्ष मजबूत करण्यासाठी त्यांचे निलंबन मागे घेण्यात आले आहे. यापुढे विशाल परब आणि त्यांचे असंख्य कार्यकर्ते कोकणात जोमाने भाजपा वाढवण्यासाठी काम करतील.

श्री. परब यांच्यावरील निलंबनाची कारवाई मागे घेण्यात आल्याचे पत्र श्री . चव्हाण यांनी यावेळी दिले. त्यांच्या बरोबर शेकडो कार्यकर्त्यांनीही पुन्हा भाजपा मध्ये प्रवेश केला.

''उबाठा'' चे सदाशिव सासे यांच्याबरोबर कैलास धुमाळ, मुरबाड उपशाखा प्रमुख, दीपक घारे, माजी सरपंच, कैलास जाधव, अनंता जाधव, युवासेना संघटक, प्रदीप वारे, देवगन सासे,सोमनाथ सासे ,बदलापुर राष्ट्रवादी उपाध्यक्ष - आदर्श तायडे, सुजित ठाकरे, नवदीप भोईर यांनीही भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला .

# जिल्ह्यात ॲग्रीस्टॅक योजनेत सात लाख शेतकऱ्यांची नोंदणी पूर्ण

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

शेतकऱ्यांना डिजिटल ओळख देऊन त्यांना सरकारी योजनांचा लाभ सुलभतेने मिळवून देणाऱ्या 'ॲग्रीस्टॅक' योजनेला अहिल्यानगर जिल्ह्यात प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. जिल्ह्यात एकूण १३ लाख ३५ हजार १२ शेतकऱ्यांपैकी ७ लाख २० हजार १७१ शेतकऱ्यांनी या योजनेत ओळखपत्रासाठी नोंदणी केली असून, यामुळे ५२.४५ टक्के काम यशस्वीरीत्या पूर्ण झाले आहे. या मोहिमेत शेवगाव तालुक्याने **शेतकरी संख्येच्या तुलनेत** सर्वाधिक ४९,८५७ शेतकऱ्यांची नोंदणी करून (७५.८८ टक्के) जिल्ह्यात सर्वाधिक प्रगती साधली आहे. ही योजना खऱ्या अर्थाने कृषी क्षेत्राला डिजिटल युगात घेऊन जाणारे एक महत्त्वाचे पाऊल ठरत आहे.

जिल्ह्यातील विविध तालुक्यांमध्येही ही मोहीम जोमाने सुरू असून, शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला आहे. कोपरगावमध्ये ३९,१९१ शेतकऱ्यांनी नोंदणी पूर्ण केली (६५.४६ टक्के), श्रीरामपूरमध्ये २९,३८० (६३.६० टक्के), नेवासा ७२,६४८ (५९.६९ टक्के) आणि राहुरी ४९,३३३ (५६.८० टक्के) शेतकऱ्यांनी नोंदणी केली आहे. त्याचप्रमाणे, कर्जत तालुक्यात ५०,७३० (५५.६६ टक्के), राहाता ३६,२६२ (५४.६६ टक्के), जामखेड ४१,५४८ (५०.४९ टक्के), अकोले ४३,१३९ (४९.१७ टक्के), संगमनेर ७५,१६५ (४९.२९ टक्के), पाथर्डी ५५,०४७ (४८.७० टक्के), पारनेर ६७,४५१ (५३.१९ टक्के), अहिल्यानगर ४६,४३५ (३९.०७ टक्के) आणि श्रीगोंदा तालुक्यात ६३,९८५ (५५.१५ टक्के) शेतकऱ्यांनी नोंदणी करून आपले योगदान दिले आहे. ही आकडेवारी जिल्हाभरातील शेतकऱ्यांचा या योजनेवरील विश्वास दर्शवते.कृषी क्षेत्रात डिजिटल सेवांचा वापर वाढवून शासनाच्या विविध योजनांचा लाभ शेतकऱ्यांना जलद व पारदर्शक पद्धतीने देणे सुलभ व्हावे, याकरिता केंद्र शासनाने १४ ऑक्टोबर २०२४ पासून महाराष्ट्रासह देशातील २४ राज्यांमध्ये 'ॲग्रीस्टॅक' योजना राबविण्यास सुरुवात केली आहे. या योजनेचा मुख्य उद्देश शेतकऱ्यांची आधार क्रमांकाशी संलग्न माहिती एकत्रित करून त्यांना एक विशिष्ट ओळख क्रमांक प्रदान करणे, तसेच केंद्र व राज्य शासनाच्या कृषी योजनांचा त्वरित लाभ मिळवून देणे हा आहे.'ॲग्रीस्टॅक' योजनेत शेतकऱ्यांना मिळणाऱ्या डिजिटल ओळखपत्रामुळे अनेक फायदे होणार आहेत. यात प्रधानमंत्री सन्मान निधी योजनेचा लाभ अधिक जलद व सुलभ होईल, शेतकऱ्यांसाठी कर्ज प्रक्रिया वेगवान होईल आणि त्यांना शेतीविकासासाठी अधिक सहाय्य मिळेल. यासोबतच, शेतकऱ्यांना बाजारपेठेपर्यंत अधिक सुलभ प्रवेश मिळेल, सरकारी कार्यालयांना वारंवार भेटी न देता डिजिटल सेवांचा लाभ घेता येईल, आणि शेतकऱ्यांना नव्या योजनांची माहिती तात्काळ मिळणार आहे. पीक विमा तसेच आपत्ती व्यवस्थापनांतर्गत शेतकऱ्यांचे नुकसान भरपाईसाठी सर्वेक्षण करणे सुलभ होईल. तसेच, किमान आधारभूत किंमतीवर खरेदीमध्ये शेतकऱ्यांची नोंदणी ऑनलाईन पद्धतीने होऊ शकेल. 'ॲग्रीस्टॅक'ओळखपत्रासाठी शेतकऱ्यांना सीएससी केंद्र, तलाठी, कृषी सहाय्यक किंवा ग्रामविकास अधिकारी यांच्यामार्फत https://mhfr.agristack.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन नोंदणी करता येते. ज्यांना ऑनलाईन प्रक्रिया अवघड वाटते, त्यांच्यासाठी गावपातळीवर महसूल विभागाच्यावतीने विशेष मोहीम राबवली जात आहे. या मोहिमेत शेतकऱ्यांचा आधारकार्ड क्रमांक त्यांच्या सातबारा उताऱ्याबरोबर जोडण्यात येऊन त्यांची 'ग्रीस्टॅक' योजनेत मोफत नोंदणी करण्यात येत आहे.

# दारूच्या नशेत रिक्षाचालकाचे भयानक कृत्य ! महिला कॉन्स्टेबलला २०० मीटर फरफटत नेलं





**सातारा । प्रतिनिधी**

साताऱ्यात एक धक्कादायक प्रकार घडला आहे. दारू प्यायलेल्या, नशेत असलेल्या रिक्षाचालकाने मोळाचा ओढा परिसरात अनेक वाहनांना धडक दिल्याची माहिती वाहतूक पोलिसांना मिळाली. त्यानंतर भाग्यश्री जाधव या महिला पोलीस कॉन्स्टेबल यांनी रिक्षाचा पाठलाग करत या रिक्षा चालकाला अडविण्याचा प्रयत्न केला. मात्र रिक्षा चालकाने कॉलर पकडत हिसका देऊन त्यांना खाली पाडलं. मात्र त्यामुळे त्या महिला कॉन्स्टेबल पोलिसाच्या रेनकोट रिक्षाचा मागील अँगल मध्ये अडकल्याने रिक्षासोबत संबंधित महिला पोलीस कॉन्स्टेबल २०० मीटर हून अधिक फरफटत गेल्याची धक्कादायक घटना घडली. हा संपूर्ण थरार साताऱ्यातील मध्यवर्ती ठिकाण म्हणजेच खंडोबाचा माळ येथून मनाली कॉर्नर पर्यंत असणाऱ्या दुकानांमधील सीसीटीव्हीत कैद झाला आहे.

या घटनेत महिला पोलीस यांना हाताला आणि डोक्याला दुखापत झाली असून त्यांना खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. दरम्यान अपघातास जबाबदार असेलला आणइ बेदरकारपणे गाडी चालवणाऱ्या या बेभान रिक्षा चालकाला संतप्त नागरिकांनी पकडून चोप दिला. घटनेची माहिती मिळताच सातारा पोलीस तात्काळ घटनास्थळी दाखल झाले आणि आरोपी चालकाला ताब्यात घेतले. सध्या आरोपीवर सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

# मराठा मोर्चासाठी येणाऱ्या वाहनांना टोल माफी द्या; खा.सोनवणे भेटले गडकरींना

## मराठा समाजाच्या मोर्चासाठी दिले MSRDC आणि NHAI ला पत्र

**बीड । प्रतिनिधी**

मराठा समाजाला आरक्षण मिळावे, यासाठी मनोज जरांगे पाटील यांच्या मुंबई मोर्चा निमित्त बीड जिल्ह्यासह राज्यभरातून मुंबईकडे लाखो वाहने येणार आहेत. या वाहनांमधून युवक, शेतकरी, कष्टकरी येणार असून त्यांच्यावर आर्थीक भार पडू नये, यासाठी त्यांच्या वाहनांना टोल माफी देण्यात यावी, अशी मागणी खा.बजरंग सोनवणे यांनी मुख्य महाव्यवस्थापक व प्रादेशिक अधिकारी, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, कोंकण-भवन, मुंबई व व्यवस्थापकीय संचालक, राष्ट्रीय महामार्ग, मुंबई यांना पत्र दिले असून केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेवूनही मागणी केली आहे.

मुख्य महाव्यवस्थापक व प्रादेशिक अधिकारी, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, कोंकण-भवन, मुंबई व व्यवस्थापकीय संचालक, राष्ट्रीय महामार्ग, मुंबई यांना दिलेल्या पत्रात म्हटले आहे, दि.२९ ऑगस्ट २०२५ रोजी मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली होत असलेल्या मुंबई येथील आंदोलनात सहभागी होण्यासाठी बीडसह राज्यातील विविध जिल्ह्यांतून मोठ्या संख्येने नागरिक मुंबईकडे प्रवास करणार आहेत.या प्रवासासाठी हजारो वाहने मुंबईकडे येणार असून त्यामुळे मार्गावरील टोल नाक्यांवर मोठी गर्दी होणार आहे तसेच प्रवाशांवर अतिरिक्त आर्थिक भार येणार आहे. शेतकरी, युवक आणि सर्वसामान्य नागरिक स्वयंस्फूर्तपणे या आंदोलनात सहभागी होत असल्यामुळे त्यांच्यावर जादा खर्च पडू नये, यासाठी त्या कालावधीत मुंबईकडे येणाऱ्या व जाणाऱ्या सर्व वाहनांना टोलमाफी देण्यात यावी, या निर्णयामुळे जनतेला आर्थिक दिलासा मिळेल, टोल नाक्यांवरील गर्दी कमी होईल व वाहतूक व्यवस्थापन सुलभ होईल म्हणून या संदर्भात तातडीने आवश्यक आदेश निर्गमित करावेत, असे म्हटले आहे. मुख्य महाव्यवस्थापक व प्रादेशिक अधिकारी, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, कोंकण-भवन, मुंबई व व्यवस्थापकीय संचालक, राष्ट्रीय महामार्ग, मुंबई यांना पत्र दिल्यानंतर खा.बजरंग सोनवणे यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांची देखील भेट घेतली. यावेळी मराठा समाजाच्या मोर्चासाठी येणाऱ्या वाहनांना टोलमाफीचा निर्णय घेण्यात यावा, तसे आदेश आपण द्यावेत, अशी मागणीही केली. यावेळी दोघात टोलमाफिच्या विषयावर सकारात्मक चर्चा झाली आहे.

### समाजासाठी पत्र देणारे पहिले लोकप्रतिनिधी

राज्यात मराठा आरक्षण प्रश्नी वातावरण तापलेले आहे.दि.२९ ऑगस्ट रोजी मुंबई येथे मनोज जरांगे पाटील यांचे आंदोलन होत आहे. यासाठी ग्रामीण भागातून येणाऱ्या गरीब मराठा समाजावर आर्थीक भार पडू नये, यासाठी टोलमाफीचे पहिले पत्र केंद्रीय मंत्री तसेच MSRDC व NHAI यांना दिले आहे. असे पत्र देणारे खा.बजरंग सोनवणे हे पहिले लोकप्रतिनिधी आहेत.



# आदिवासी समाजाच्या प्रश्नांवर महसूल मंत्र्यांनी घेतली बैठक; लवकरच तोडगा काढण्याचे निर्देश

**नंदुरबार । दिपक गोसावी**

तळोदा शहरातील आदिवासी समाजाच्या जिव्हाळ्याचा प्रश्न असलेल्या जहागीरदारी आणि घरकुल विषयावर महाराष्ट्राचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी नुकतीच एक महत्त्वाची बैठक घेतली. गेल्या काही दिवसांपासून या प्रश्नावर सातत्याने पाठपुरावा करणाऱ्या आ. चंद्रकांतजी रघुवंशी यांच्या मागणीनुसार ही बैठक आयोजित करण्यात आली होती.



मुंबई येथे झालेल्या या बैठकीत नाशिक, धुळे, आणि नंदुरबार येथील संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांशी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे चर्चा करण्यात आली. यावेळी आ. चंद्रकांतजी रघुवंशी यांच्यासोबत तळोदा येथील शिवसेनेचे पदाधिकारीही उपस्थित होते. या बैठकीत जहागीरदारी आणि घरकुलचा प्रश्न लवकरात लवकर कसा मार्गी लावता येईल, यावर सखोल विचारविनिमय करण्यात आला.

यावेळी आ.रघुवंशी आणि पदाधिकाऱ्यांनी संबंधित अधिकाऱ्यांसमोर शासकीय कागदपत्रे आणि न्यायालयाचे निकाल सादर करून या विषयाची गुंतागुंत स्पष्ट केली. सर्व माहिती समजून घेतल्यानंतर महसूल मंत्री बावनकुळे यांनी अधिकाऱ्यांना यावर तातडीने अभ्यास करून योग्य तोडगा काढण्याचे आदेश दिले.मंत्र्यांनी दिलेल्या या आश्वासनामुळे तळोदा येथील आदिवासी समाजामध्ये एक आशेचा किरण निर्माण झाला असून, हा प्रश्न लवकरच मार्गी लागेल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# माळवान ग्रामस्थांचा वनसंरक्षण उपक्रमाला सकारात्मक प्रतिसाद

**नंदुरबार । दिपक गोसावी**

नवापूर तालुक्यातील मौजे माळवान येथे आयोजित ग्रामसभेत वनसंरक्षण आणि संवर्धनाविषयी जनजागृती करण्यात आली. या वेळी वनकर्मचाऱ्यांनी गावकऱ्यांशी संवाद साधून वनसंपदेचे महत्त्व समजावून सांगितले. गावकऱ्यांनी या उपक्रमाला सकारात्मक प्रतिसाद देत वनगुन्ह्यांना आळा घालण्यासाठी सहकार्य करण्याची ग्वाही दिली.



वनकर्मचाऱ्यांनी आपल्या भाषणात अवैध वृक्षतोड, अवैध वाहतूक, शिकार आणि वनवणवा यांसारख्या वनगुन्ह्यांविषयी माहिती दिली. त्यांनी गावकऱ्यांना अशा बेकायदेशीर कृतींमध्ये सहभागी न होण्याचे आणि वनसंपत्तीचे रक्षण करण्याची शपथ घेण्याचे आवाहन केले.

वनसंपदा ही सामूहिक संपत्ती आहे आणि तिचे रक्षण करणे ही सर्वांची जबाबदारी आहे, यावर त्यांनी भर दिला. पर्यावरण संतुलन, जलस्रोत संवर्धन, आणि भविष्यातील पिढ्यांसाठी जंगलांचे जतन करणे किती आवश्यक आहे, हे त्यांनी सोप्या भाषेत पटवून दिले.

ग्रामसभेत उपस्थित असलेल्या गावकऱ्यांनी वनकर्मचाऱ्यांच्या या प्रयत्नांचे कौतुक केले आणि अवैध कृत्यांना पायबंद घालण्यासाठी तसेच जंगलांच्या संरक्षणासाठी वन विभागाला पूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. या निर्णयामुळे माळवान परिसरात वनसंपदेचे संरक्षण अधिक प्रभावी होईल अशी आशा व्यक्त केली जात आहे.

# तळोदा येथे महादेवाला समर्पित 'अतिरुद्र महायाग' संपन्न



**नंदुरबार । दिपक गोसावी**

तळोदा येथील सिद्धेश्वर महादेवाच्या मंदिरात योगेश कांतीलाल चौधरी यांच्या वतीने एक भव्य असा 'अतिरुद्र महायाग' आयोजित करण्यात आला होता. नंदुरबार जिल्ह्याच्या इतिहासात पहिल्यांदाच असा दुर्मिळ धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आल्याचा दावा मुख्य पुरोहित अजय जोशी अंमळनेरकर यांनी केला आहे.पाच दिवसांच्या पवित्र श्रावण महिन्यातील या यज्ञात महाराष्ट्रातील एकूण ३५ ब्राह्मण सहभागी झाले होते. या महायागामध्ये एकूण १४,६४१ वेळा आवर्तनाचा अभिषेक करण्यात आला. हा यज्ञ 'लघुरुद्र' आणि 'महारुद्र' यांसारख्या यज्ञांपेक्षा उच्च आणि अधिक महत्त्वाचा मानला जातो. महादेवाच्या सेवेसाठी आयोजित करण्यात आलेल्या या यज्ञादरम्यान एकादशीनिमित्त कीर्तनाचेही आयोजन करण्यात आले होते.या अतिशय दुर्मिळ धार्मिक कार्याची सांगता २१ ऑगस्ट २०२५ रोजी सायंकाळी ५ वाजून ३० मिनिटांनी एका पालखी मिरवणुकीच्या माध्यमातून करण्यात आली. या भव्य आयोजनामुळे तळोदेकरांसाठी ही एक अभिमानाची बाब असल्याचे पुरोहितांनी सांगितले.

# हनुमंत पिंपरी येथे कायदे विषयक जन जागरण शिबिर उत्साहात संपन्न

**केज । प्रतिनिधी**

तालुका विधी सेवा समिती,केज व वकील संघ,केज यांच्या संयुक्त विद्यमाने दि.२१ ऑगस्ट २०२५ रोजी हनुमंत पिंपरी येथील श्री. ज्ञानेश्वर माऊली माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात कायदे विषयक जन जागृती शिबिराचे सकाळी ९-३० वाजता आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठविधिज्ञ डी.टी.सपाटे होते.तर प्रमुख पाहुणे म्हणून पंचायत समिती केजचे प्रतिनिधी श्री.रोडेवाड, तहसील कार्यालयाचे प्रतिनिधी,अड.एस.व्ही.मिसळे,अड.यु.बी. निंगुळे यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी शिबिरात पशु वैद्यकीय पशुधन पर्यवेक्षक श्री.डी.एस.चवडे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.पंचायत समिती सदस्य श्री.रोडेवाड यांनी शासनाच्या विविध योजना,व स्वच्छता विशेषतः शेतकऱ्यांच्या व हागणदारीमुक्त गाव योजना ग्रामविकासाशी निगडित योजना याबाबत



सविस्तर माहिती दिली.यावेळी अड.यु.बी.निंगुळे यांनी बालकांचे आधिकार याबाबत विद्यार्थ्यांना उपयुक्त अशी माहिती दिली.तर अड.एस. व्ही.मिसळे यांनी हुंडा आणि जाती भेद,गरीबी निर्मूलन योजना २०१५ तसेच लिगल सर्व्हिसेस फॉर चिल्ड्रन स्किम २०२४ याबाबत मार्गदर्शन केले.

आपल्या अध्यक्षीय समारोपात ज्येष्ठ विधिज्ञ डी.टी.सपाटे यांनी ट्रॅफिक नियमांचे पालन,समाजातील महिलांची सुरक्षा, गोपनीयता याविषयी मार्गदर्शन करत ज्येष्ठ नागरिकांची काळजी घेण्याचे आवाहन उपस्थितांना केले.तसेच उपस्थित विद्यार्थ्यांना अभ्यासाविषयी मार्गदर्शन करत व्यसनमुक्ती विषयक मोलाचा सल्ला दिला. या कायदेविषयक शिबीर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अड.एस. व्ही.मिसळे यांनी केले तर आभार प्रदर्शन शाळेचे मुख्याध्यापक श्री.व्ही.बी.चाळक यांनी मानले.कार्यक्रमास शाळेतील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांची उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वीतेसाठी

मुख्याध्यापक व्ही.बी. चाळक व ग्रामसेवक पतंगे यांनी परिश्रम घेतले यावेळी विद्यार्थी मोठ्या संख्येनेउपस्थित होते.

## मनवाणीच्या पोळी उत्सवावर यंदा ड्रोन कॅमेऱ्याचा वॉच

# पोळ्याच्या पार्श्वभूमीवर मनवाणीत ग्रामस्थ व पोलीस प्रशासनाची संयुक्त बैठक

**मोलगी । रविंद्र वळवी**

आगामी पोळा सण शांततापूर्ण आणि उत्साहात साजरा करण्यासाठी धडगाव पोलीस ठाण्यांतर्गत येणाऱ्या मनवाणी बुद्रुक गावामध्ये दिनांक १८ ऑगस्ट २०२५ रोजी एक महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. पोलीस निरीक्षक राजेंद्र जगताप यांच्या उपस्थितीत झालेल्या या बैठकीत गावातील पोळा उत्सव समिती आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.




या बैठकीत शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी काही महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. गावातील लोकांनी सण शांततेत साजरा करावा, कोणत्याही क्षुल्लक कारणावरून वाद होणार नाही याची काळजी घ्यावी, असे आवाहन पोलीस निरीक्षक जगताप यांनी केले. तसेच, सणाच्या काळात गावात कोणत्याही प्रकारची अवैध दारू विक्री होणार नाही याची दक्षता घेण्यास सांगितले.सुरक्षिततेच्या दृष्टीने, उत्सवादरम्यान परिसरावर ड्रोनच्या साहाय्याने चित्रीकरण केले जाणार आहे. याशिवाय, मिरवणुकीसाठी २ ते ३ बँड पथके लावण्यास परवानगी देण्यात आली आहे, मात्र त्यासाठी पोलीस ठाण्याची रीतसर परवानगी घेणे बंधनकारक असेल. गर्दीचे व्यवस्थापन आणि वाहतुकीचे नियोजन करण्यासाठी स्वयंसेवकांची नेमणूक करावी आणि वाहन पार्किंगच्या ठिकाणी लाकडी बॅरिकेडिंग करावी, अशा सूचनाही देण्यात आल्या.या बैठकीला एकूण ६३ ग्रामस्थांसह पोलीस पाटील नायलीबाई वळवी, सरपंच गुलाबसिंग राहसे,पोलीस पाटील रामा वळवी, तसेच सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक फुलसिंग पटले, पोलीस हवालदार पुष्पेंद्र कोळी, शिवलाल पावरा, आणि पोलीस शिपाई निलेश पानपाटील व मानसिंग वळवी हे उपस्थित होते.पोलीस प्रशासनाने ग्रामस्थांच्या सहकार्याने घेतलेल्या या पुढाकारामुळे यंदाचा पोळा सण अधिक सुरक्षित आणि शिस्तबद्ध पद्धतीने साजरा होईल, अशी आशा व्यक्त केली जात आहे.

# तळोद्यातील कलावती फाउंडेशनमुळे आजोबांच्या पाठीवरील गाठीची यशस्वी शस्त्रक्रिया

**नंदुरबार । दिपक गोसावी**

गरजू रुग्णांसाठी आधारवड ठरलेल्या कलावती फाउंडेशन रुग्ण सहायता केंद्राने पुन्हा एकदा आपल्या सामाजिक कार्याची प्रचिती दिली आहे. तळोद्यातील अमोनी गावातील ७० वर्षीय भामट्या वळवी या आजोबांच्या पाठीवर अनेक वर्षांपासून असलेल्या मोठ्या गाठीची यशस्वी शस्त्रक्रिया या संस्थेच्या पुढाकारामुळे पार पडली आहे. आजोबांना अनेक वर्षांपासून या गाठीमुळे त्रास होत होता. त्यांनी आपली व्यथा तळोद्यातील आमदार राजेश पाडवी सेवा केंद्रात मांडल्यानंतर, कलावती फाउंडेशनच्या कार्यकर्त्यांनी तातडीने दखल घेतली. केंद्राचे समन्वयक योगेश मराठे आणि त्यांचे सहकारी मुकेश बिरारे, अण्णा पाटील व राकेश महाले यांनी त्वरित सूत्रे हलवली.



या टीमने आजोबांना तळोद्याच्या उपजिल्हा रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. रोहित वसावे यांच्याकडे दाखल केले. डॉ. वसावे आणि त्यांच्या वैद्यकीय टीमने ही गुंतागुंतीची शस्त्रक्रिया यशस्वी करून दाखवली. शस्त्रक्रियेत मीना चव्हाण, शस्त्रक्रिया गृह सहाय्यक रवींद्र गिरासे आणि माधुरी गवळी यांनी मोलाची मदत केली.

शस्त्रक्रियेनंतर वळवी आजोबांनी सुटकेचा निःश्वास सोडला. त्यांनी कलावती फाउंडेशन, आमदार राजेश पाडवी आणि संपूर्ण वैद्यकीय टीमचे मनःपूर्वक आभार मानले. या घटनेमुळे, कलावती फाउंडेशन रुग्ण सहायता केंद्र हे ग्रामीण भागातील रुग्णांसाठी एक आशेचा किरण ठरत असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077